**प्रकल्प पुरस्कर्ते मेसर्स श्री राजा खंडेराव देशमुख पळशीकर , नांदेड यांच्या प्रस्तावित बहिलामपूर चुनखडी/डोलामाईट खाण प्रकल्प, खसरा क्रं. ४२ व ४६, गाव- झरी-जामनी, जिल्हा-यवतमाळ (क्षेत्र - ४७.१२ हेक्टर, उत्पादन क्षमता-०.०५ दशलक्ष टन/वर्ष) येथे करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प पुरस्कर्ते मेसर्स श्री राजा खंडेराव देशमुख पळशीकर, नांदेड यांच्या प्रस्तावित बहिलामपूर चुनखडी/डोलामाईट खाण प्रकल्प, खसरा क्रं. ४२ व ४६, गाव- झरी-जामनी, जिल्हा-यवतमाळ (क्षेत्र - ४७.१२ हेक्टर, उत्पादन क्षमता-०.०५ दशलक्ष टन/वर्ष) येथे करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी प्रकल्प स्थानावर दिनांक १६ मे, २०१७ रोजी दुपारी ११.३० वाजता आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबईयांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई -३६/२०१७, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/ बी- १९१५, दि. ०९-०५-२०१७ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली:-

श्री धुमाळ, समन्वयक यांनी समितीचे अध्यक्ष, सरकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी व पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीस मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व पुढिल १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारी असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आले आहे. उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांना प्रकल्प पुरस्कर्ते मेसर्स श्री राजा खंडेराव देशमुख पळशीकर, नांदेड यांच्या प्रस्तावित बहिलामपूर चुनखडी/डोलामाईट खाण प्रकल्प, खसरा क्रं. ४२ व ४६, गाव- झरी-जामणी, जिल्हा-यवतमाळ (क्षेत्र – ४७.१२ हेक्टर, उत्पादन क्षमता- ०.०५ दशलक्ष टन/वर्ष) करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग १ (ए) वर्गात मोडत आहे. उपरोक्त प्रकल्पास १५-१६ जानेवारी, २०१५ च्या २९ व्या बैठकीत प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यात आलेली आहे.

पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता यात मराठीसाठी दिनांक ०१-०४-२०१७ व दैनिक द हितवाद मध्ये इंग्रजीत दिनांक -०१-०४-२०१७ रोजी एक महिना अगोदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रसिध्द केली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची प्रत भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नागपूर कार्यालय,मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-यवतमाळ, जिल्हा परिषद- यवतमाळ, तहसील कार्यालय- झरी-जामनी, जिल्हा-यवतमाळ, जिल्हा उद्योग केंद्र- जिल्हा- यवतमाळ, ग्रामपंचायत कार्यालय-बहिलामपूर, तालुका-झरी-जामनी, जिल्हा- यवतमाळ, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, पर्यावरण विभाग-मंत्रालय, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,चंद्रपूर येथे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांना वरिल प्रकल्पाबाबत दोन सूचना नोंदविण्यात आलेल्या आहेत. संबंधितांना जाहिर लोकसुनावणीवेळी हजर राहण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. समन्वयक यांनी असे सांगितले की उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना करण्याची संधि देण्यात आली असून लेखी व तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. त्यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती राज्य व स्थानिक भाषा मराठीत करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्प अधिका-यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती उपस्थित जनसमूहास दिली. तदनंतर मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांना काही आक्षेप, हरकती व सूचना असल्यास नमुद करण्याचे आवाहन केले.

श्री पी.एम. जोशी, सदस्य यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की मप्रनि मंडळाच्या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत दोन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. एक सूचना श्री सुनंदन रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबाद यांची व दुसरी सूचना रुरल एन्वॉयरन्मेंट एज्युकेशन अँड हेल्थ अवेअरनेस सोसायटी, बहिलामपूर, हैद्राबाद यांची आहे. श्री जोशी, सदस्य यांनी सांगितले की दोन्ही सूचना अहवालासोबत वने, पर्यावरण व हवामान बदल विभाग, भारत सरकार यांना पाठविण्यात येतील.

श्री पितांबर तानबा ठाकरे, राहणार – बहिलामपूर, जिल्हा-यवतमाळ यांनी माननीय जिल्हाधिकारी यांचे अतिशय लहान असणा-या खेड्यात येण्याचे आभार मानून व अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती या नात्याने बैठकीस आल्याचे त्याचे स्वागत केली. श्री ठाकरे यांनी असे नमुद केले की आपणा सर्वांचाच अनुभव आहे की एखादा प्रकल्प कार्यान्वित झाल्यातर काही दिवसांनी प्रकल्प परिसरात पर्यावरणाचा प्रश्न उपस्थित होतो. ह्या खाण प्रकल्पामुळे स्थानिक जनतेस त्यांच्यावर परिसरात मुक्त फिरणा-यावर बंदी

येईल. त्यांनी सांगितले की पिढ्यानपिढ्या या परिसरात येथील शेतकरी आपली जनावरे चा-यासाठी घेऊन येतात. प्रकल्पामुळे जनावरांची चा-याची जागा नाहिशी होईल व जनावरांवर उपासमारीची वेळ येईल अशी भिती श्री ठाकरे यांना व्यक्त केली.

श्री राजू भास्कर भोयर, राहणार-बहिलामपूर यांनी सांगितले की प्रकल्प स्थानापासून फक्त ३०० मीटर्सवर गाव आहे. या खाणकामामुळे परिसरात धुळीचे प्रदूषण होऊन स्थानिकांना त्याचा त्रास होईल. सदरहू धुळ ही शेतातील पिकांवर पडून पिकांचे नुकसान होईल. तरी धुळीचे प्रदूषण न होण्याची काळजी घेणे गरजेचे आहे. .

श्री दामोदर शंकर खडसे, राहणार-बहिलामपुर यांनी सांगितले की प्रकल्प स्थानापासून अगदी लागूनच स्थानिक शेतक-यांच्या शेती आहे. स्थानिक जनता प्रकल्पाच्या विरोधात नाहीत, पण प्रकल्प प्रवर्तकांनी कुठलेही प्रदूषण न होण्याच्या उपाययोजना कराव्यात.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती श्री सचिंद्रप्रताप सिंह यांनी स्थानिकांना सदरहू प्रकल्पामुळे काही त्रास होईल असे वाटत असल्यास ते सांगण्यास सांगितले. श्री खडसे यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे स्थानिकांच्या मुक्तपणे ये-जा करणा-यावर बंदी येईल अशी भिती स्थानिकांना वाटते. प्रकल्प परिसर हा पूर्णपणे सिंचनाखाली/ओलिताखाली आलेला आहे व स्थानिक शेतकरी बारमाही पिके पिढ्यानपिढ्या घेत आहेत. प्रकल्पात तयार होणा-या धुळीमुळे निश्चितच शेतीच्या उत्पादनावर परिणाम होईल असे मत त्यांनी मांडले.

सौ. जया मनोज पानवे,सरपंच, बहिलामपूर यांनी असे मत व्यक्त केले की प्रकल्पामुळे स्थानिक मुलांवर व रहिवाशांवर त्यांच्या मुक्तपणे ये-जा करणा-यावर बंदी येईल अशी भिती वाटते. त्याचप्रमाणे धुळीमुळे स्थानिकांना श्वसनाचे आजार

होतील अशी भिती वाटते. सौ. पानचे यांनी याबाबत काही पर्यायी योजना तयार करण्याची मागणी केली.

श्री रमेश भाऊराव शिरपुरे, पोलीस पाटील व स्थानिक रहिवाशी यांनी सांगितले की प्रकल्प स्थानापासून लागूनच पिढ्यानपिढ्या करत असलेली शेतजमिन आहे. हा परिसर पूर्णपणे ओलिताखाली आलेला असून परिसरात संपुर्ण वर्ष कपाशी, सोयाबिन, भुईमूग यांसारखे उत्पादन घेण्यात येते. श्री शिरपुरे यांनी असे सांगितले की येथील स्थानिक जनता ही प्रकल्पाच्या विरोधात नाही. पण स्थानिक शेतक-यांना ओलिताखाली आलेली जमिन प्रकल्पास द्यावी लागेल अशी भिती स्थानिकांना वाटते. त्याचप्रमाणे जे शेतकरी प्रकल्पासाठी जमिन देतील, त्यांचे पुनर्वसन झालेच पाहिजे. काही पर्यायी व्यवस्था बाधित शेतक-यांसाठी असण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. त्यांचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे निर्माण होणा-या धुळीमुळे ज्या स्थानिक शेतक-यांच्या पिकांवर परिणाम होईल, त्यांना एखादी पॅकेज योजना स्थानिक शेतक-यांबरोबर चर्चा करुन तयार करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रकल्पामुळे बाधित होणा-या स्थानिकांना प्रकल्प प्रवर्तकांनी वैद्यकीय सेवा पुरविण्याची योजना तयार करावी.

श्री शिरपुरे यांनी पुढे असे सूचित केले की स्थानिक गरिब कुटुंबातील दहा विद्यार्थ्यांना दर आर्थिक वर्षात त्यांना शैक्षणिक गरजेसाठी आर्थिक मदत करण्यात यावी.

श्री सुनंदन रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबाद यांनी काही लेखी सूचना दिलेल्या आहेत. त्यांनी आवाहन केले की प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक रहिवाशांचा आत्मविश्वास वाढण्यासाठी दिलेल्या सूचनांचे पालन करावे. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक व प्रकल्प अधिकारी यांची एक समिती स्थापन करुन केलेल्या सूचनांच्या अमंलबजावणीची दिशा ठरवावी.

श्री विनोद भास्कर भोयर, उपसरपंच, बहिलामपूर व स्थानिक रहिवाशी यांनी सांगितले की त्यांची शेतजमिन प्रकल्प परिसराच्या तिन्ही बाजूस आहे. तरी त्यांना व प्रकल्पामुळे होणा-या बाधित शेतक-यांना आर्थिक मोबदला देण्यात यावा. त्याचप्रमाणे ज्या स्थानिक विद्यार्थ्यांकडे आवश्यक तांत्रिक शैक्षणिक अर्हता आहे, अशांनाच प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी.

श्री जोशी, सदस्य यांनी प्रकल्प प्रवर्तकांच्या तांत्रिक सल्लागारांना उपस्थित केलेल्या मुद्द्यांनुसार प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेबाबत माहिती देण्यास सांगितले.

प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की रहदारीसाठी तयार करण्यात येणारा रस्ता हा तेथील गावातून जाणार नसून गावाबाहेरुनच स्थानिकांच्या मदतीने योजना तयार करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पात उत्पादन अत्यंत कमी असल्याने त्या रस्तावरुन प्रकल्पाची वाहने अत्यंत कमी प्रमाणात जा-ये करणार आहेत. प्रकल्पात डस्ट सप्रेशन सिस्टिम बसविण्यात येणार असल्याची त्यांनी माहिती दिली. त्यामुळे धुळीचे कोणतेही प्रदूषण होणार नसल्याची माहिती प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी दिली. त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांची ओलिताखाली आलेली जमिन प्रकल्पासाठी घेण्याची इच्छा नसल्याचे सांगितले.

तांत्रिक सल्लागारांनी प्रकल्पात स्प्रिंकर्लस् बसविणार असल्याची माहिती दिली. श्री जोशी, सदस्य यांनी स्प्रिंकर्लस् किती लावणार याचा आकडा उपस्थित जनतेस सांगण्यास सांगितले. पुर्ण चर्चा करुन प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की एकूण ३० (तीस) स्प्रिकर्लस् बसविण्यात येतील. त्याचप्रमाणे तांत्रिक सल्लागार यांनी वेळोवेळी वैद्यकीय शिबिर घेणार असल्याची माहिती दिली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती श्री सचिंद्रप्रताप सिंह यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी बेसलाईन सर्व्हे डाटा योग्य केल्याचे मत मांडले. त्यात शेती व वैद्यकीय सद्यस्थितीचा समावेश करण्याच्या सूचना केल्या. श्री जोशी, सदस्य यांनी प्रकल्प प्रवर्तकांना संगत असलेल्या टीओआरमधील पान नं.१०५ चा उल्लेख करुन सांगितले की टीओआरनुसार पूर्व प्रकल्पाची स्थिती व प्रकल्पानंतरची शेती व वैद्यकीय सद्यस्थिती बेसलाईन डाटात अंतर्भूत असणे अपेक्षित आहे.

श्री जोशी, सदस्य यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांना रोजगाराची संधि देण्याबाबत माहिती देण्यास सांगितले. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की त्यांना सुरवातीस ३०-३५ मनुष्यबळाची जरुरी भासेल. प्रकल्प प्रवर्तकांनी असेही सांगितले की स्थानिकांच्या सहकार्याशिवाय प्रकल्प यशस्वी होत नाही. त्यामुळे स्थानिकांची गरज भासणारच आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी अशी सूचना केली की प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पात आवश्यक असलेल्या मनुष्यबळाचे वर्गीकरण शिक्षित, अशिक्षित, प्रशिक्षित असे करुन त्याची माहिती स्थानिक बेकार युवकांना उपलब्ध करुन द्यावी. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने बेकार तरुण/तरुणींना सक्षम करण्यासाठी "कौशल्य विकास कार्यक्रम" हाती घेतला असून तसा हाती घेण्यात यावा. जेणेकरुन स्थानिक युवक-युवतींना त्यांचे कौशल्य विकास करण्याची संधि मिळेल व प्रकल्प प्रवर्तकांनाही कुशल मनुष्यबळ उपलबध होईल.

श्री जोशी, सदस्य यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी शैक्षणिक सहाय्याबाबत आश्वासन देण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तकांनी आश्वासन दिले की स्थानिकांमधील दारिद्य रेषेखाली असलेल्या दहा विद्यार्थ्यांना प्रकल्प प्रवर्तक

शैक्षणिक आर्थिक सहाय्य करेल. सदरहू योजनेची रुपरेखा स्थानिकांशी चर्चा करुन संबंधित योजनेची मानके ठरविण्यात येतील.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी गाव/परिसर विकासासाठी एक समिती स्थापून त्यात गावाचे सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, तलाठी, ग्रामसेवक व स्थानिकांचे प्रतिनिधी यांचा समावेश असावा अशी सूचना केली व त्यांनी गाव विकासाचा कार्यक्रम व सुनावणी दरम्यान करण्यात आलेल्या सूचना व त्यांची अंमलबावणी कालावधी याच्या कृतीसाठी एक योजना तयार करण्यात यावी.

श्री जोशी, सदस्य यांनी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी अंतर्गत योजनांची माहिती घेत असताना सांगितले की ध्वनि प्रदूषणाची पातळी ही विहित निष्कर्षापेक्षा जास्त असल्याचे आढळून आलेली आहे. श्री जोशी, सदस्य यांनी अशी सूचना केली की प्रकल्प प्रवर्तकांनी ध्वनि प्रदूषणाबाबत मासिक सर्वेक्षण करुन सदरहू निष्कर्ष सार्वजनिक डोमेनमध्ये स्थानिकांसाठी प्रसिध्द करण्यात यावे. जेणेकरुन स्थानिकांना प्रदूषण पातळीबाबतची माहिती मिळेल. श्री जोशी यांनी अशीही सूचना केली की स्थानिकांना औषधे अल्प दरात उपलब्ध करुन देण्यात यावीत व टीओआरमध्ये केलेल्या निर्देशांप्रमाणे स्थानिक सद्यस्थितीचा वैद्यकीय अहवाल सर्वेक्षणाचा अंतर्भाव अंतिम अहवालात करण्यात यावा.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी श्री जोशी, सदस्य यांना अध्यक्षांच्या वतीने बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली. श्री जोशी यांनी अध्यक्षांच्या वतीने उपस्थित प्रकल्पाचे अधिकारी, शासकीय अधिकारी व उपस्थित स्थानिक लोक ज्यांनी अतिशय योग्य सूचना बैठकीत मांडल्या, त्यांचे आभार मानले. श्री जोशी यांनी असे सांगितले की बैठकीत करण्यात आलेल्या सूचनांचा अंतर्भाव इतिवृतात करण्यात येऊन त्याची एक प्रत

व बैठकीतील चर्चेची एक सीडी ग्रामपंचायत कार्यालयास देण्यात येईल, जेणेकरुन ग्रामपंचायतीस केलेल्या सूचनांबाबत पाठपुरावा करणे सोपे जाईल.

अध्यक्षांच्या परवानगीने बैठक पुर्ण झाल्याचे जाहिर करण्यात आले.

(सचिंद्रप्रताप सिंह)
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर
लोकसुनावणी समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ
जिल्हा- यवतमाळ

सील

(प्रविण जोशी)
सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, चंद्रपूर

(पी. एन. धुमाळ)
समन्वयक तथा
प्रभारी,उप प्रादेशिक अधिकारी,
चंद्रपूर